# **नोटीस**

दि. ३० /६/२०२५

इतिहास विभागातील सर्व प्राध्यापकांना कळविणेत येते की, सोमवार दि. ०१/०७/२०२५ रोजी इतिहास विभागात स. ११.०० वाजता बैठक आयोजित करणेत आली आहे. तरी सर्व प्राध्यापकांनी वेळेत उपस्थित रहावे ही विनंती.

**बैठकीपुढील विषय :-**

१) विषय (पेपर) वाटप
२) तासिकांचे नियोजन
३) प्रथम वर्ष पदवी (बी.ए.) परीक्षेचे बदललेले स्वरूप
४) NEP२.० प्रमाणे झालेले बदल
५) विभागाचे वार्षिक नियोजन
६) विभागाचे ग्रंथालय अद्ययावत करणे

डॉ. महादेव शिंदे

इतिहास विभागप्रमुख

.

# मिटिंग अहवाल

दि. १ जुलै २०२५ रोजी मंगळवार सकाळी ११ वाजता इतिहास विभागामध्ये बी.ए. व बी.ए.बी.एड. विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची प्रथम सत्रातील बैठक संपन्न झाली. सदरची बैठक इतिहास विभागात पार पडली.

या बैठकीवेळी इतिहास विभागाची विषय (पेपर) वाटप, तासिकांचे नियोजन, प्रथम वर्ष पदवी (बी.ए.) परीक्षेचे व विषयांचे बदललेले स्वरूप, बी. ए. तृतीय वर्ष NEP१.० प्रमाणे झालेले बदल आदी विषयावर सविस्तर चर्चा झाली. याशिवाय ऐतिहासिक चित्रपट दाखवणे, पीपीटी, व्हिडिओ, हेरिटेज वॉक, ऐतिहासिक डॉक्युमेंटरी तयार करणे, ग्रुप डिस्कशन, आणि विभागाचे ग्रंथालय या विषयावर चर्चा झाली. हि बैठक इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. महादेव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी प्रा. चंद्रशेखर काटे, प्रा . उत्तम वडिंगेकर,  प्रा. पियुष डहाळे, प्रा. डॉ. दीपक चव्हाण, प्रा. सुरज चौगुले आणि प्रा. अमित पाटील उपस्थित होते.



## नोटीस

**दि. २१/०९/२०२६**

इतिहास विभागातील सर्व सहकारी प्राध्यापकांना कळवीणेत येते कि,  दि. २३/०९/२०२६ रोजी आपल्या विभागाची बैठक सकाळी ११.३० वा. आयोजित करणेत आली आहे. तरी सर्वांनी बैठकीस उपस्थित राहावे.

**विषय :- १.** युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ यादी मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचा समावेश केला आहे. त्या अनुषंगाने कार्यक्रमाचे नियोजन करणे.

डॉ. महादेव शिंदे
इतिहास विभागप्रमुख

## अहवाल

इतिहास विभागाची सर्व प्राध्यापकांची बैठक दि. २३/०९/२०२६ रोजी सकाळी ११.३० वा. इतिहास विभागात पार पडली. यामध्ये युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ यादी मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचा समावेश केला आहे. त्या अनुषंगाने कार्यक्रमाचे नियोजन करण्याचे योजून या कार्यक्रमासाठी सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड येथील इतिहास विभागाचे प्राध्यापक व प्रसिध्द कीर्तनकार नितेश रायकर यांना आमंत्रित करण्याचे ठरले.

सदर कार्यक्रम २६/०९/२०२६  रोजी सकाळी १०.०० वा. घेणेचा सर्वानुमते ठरविण्यात आले.

# नोटीस

दि. १९/१०/२०२५

इतिहास विभागातील सर्व प्राध्यापकांना कळविणेत येते की,गुरूवार दि. २२/१०/२०२५ रोजी इतिहास विभागात स. ११.०० वाजता बैठक आयोजित करणेत आली आहे. तरी सर्व प्राध्यापकांनी वेळेत उपस्थित रहावे ही विनंती

**बैठकीपुढील विषय :-**

१) अभ्यासक्रम पूर्तता

२) कार्यक्रमाचे नियोजन

डॉ. महादेव शिंदे

इतिहास विभागप्रमुख

# इतिवृत्त

इतिहास विभागाची नियोजित बैठक विभागात दिनांक २२/१०/२०२५ रोजी इतिहास विभागप्रमुख डॉ. महादेव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत विभागातील सहा सी.एच.बी. प्राध्यापकांनी अभ्यासक्रमाची पूर्तता किती केली आहे याचा आढावा घेतला. त्याचबरोबर अभ्यासक्रमाशी निगडीत अन्य कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबतचे नियोजन केले.

**नोटीस**

दि. ३०/१२/२०२५

इतिहास विभागातील सर्व प्राध्यापकांना कळविणेत येते की,गुरूवार दि. ०२/०१/२०२६ रोजी इतिहास विभागात स. ११.०० वाजता बैठक आयोजित करणेत आली आहे. तरी सर्व प्राध्यापकांनी वेळेत उपस्थित रहावे, ही विनंती.

**बैठकीपुढील विषय :-**

१) विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित चित्रफित दाखवणे

२) दुसऱ्या सत्राचे नियोजन

३) १२ जानेवारी रोजीच्या मातोश्री जिजाबाई व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त पोस्टर प्रदर्शन स्पर्धा आयोजित करणे.

४) प्रथम वर्ष पदवी (बी.ए.) पेपरचे बदललेले स्वरूप (CEP)

डॉ. महादेव शिंदे

इतिहास विभागप्रमुख

# अहवाल

दि. २ जानेवारी २०२६ रोजीशुक्रवार सकाळी ११ वाजता इतिहास विभागामध्ये बी.ए. व बी.ए.बी.एड. विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची द्वितीय सत्रातील बैठक संपन्न झाली. सदरची बैठक इतिहास विभागात पार पडली.

या बैठकीवेळी इतिहास विभागाचीविभागाचे मासिक नियोजन, प्रथम वर्ष पदवी (बी.ए.) विषयांचे बदललेले स्वरूप, बी. ए. तृतीय वर्ष NEP १.० प्रमाणे झालेले बदल आदी विषयावर सविस्तर चर्चा झाली. याशिवाय ऐतिहासिक चित्रपट दाखवणे, पीपीटी, शैक्षणिक सहलीचे नियोजन, ऐतिहासिक डॉक्युमेंटरी तयार करणे, ग्रुप डिस्कशन आणि विभागाचे ग्रंथालय या विषयावर चर्चा झाली. हि बैठक इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. महादेव शिंदे सर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी प्रा. चंद्रशेखर काटे, प्रा. उत्तम वडिंगेकर, प्रा. पियुष डहाळे, प्रा. डॉ. दीपक चव्हाण, प्रा. सुरज चौगुले आणि प्रा. अमित पाटील उपस्थित होते.



# राजमाता जिजाबाई जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम अहवाल

महावीर महाविद्यालय मध्ये दिनांक १२जानेवारी २०२६रोजी इतिहास विभागामार्फत राजमाता जिजाऊ जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. या निमित्तानेमहाविद्यालयामध्ये पोस्टर प्रेसेंटेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रतिमा पूजन, तसेच स्पर्धेचे उद्घाटन मा. इतिहास विभाग प्रमुख डॉ. महादेव शिंदे सर डॉक्टर रवींद्र मिरजकर सर यांनी केले. सहभागी विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या थीम देण्यात आल्या होत्या. मिळालेल्या थीमनुसार विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण असे पोस्टर्स बनवले होते. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबरच इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ही सहभाग नोंदवला होता. यामध्ये शाहू कॉलेज आणि शहाजी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. सदरच्या पोस्टरप्रदर्शनामध्ये एकूण ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. केलेले नावीन्यपूर्ण पोस्टर्स हे मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये तयार करण्यात आले होते. सदरचे पोस्टर सादरीकरणासाठी प्रत्येक विद्यार्थ्यास पाच मिनिटांचा कालावधी देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या पोस्टरचे सादरीकरण स्वतः केले. परीक्षक म्हणून डॉ. शशिकांत अन्नदाते सर, डॉक्टर अंकुश बनसोडे आणि डॉक्टर सुषमा चौगुले यांनी काम पाहिले. यावेळी इतिहास विभागातील प्राध्यापक चंद्रशेखर काटे, पियुष डहाळे, सुरज चौगुले, उत्तम वडिंगेकर, अमित पाटील आणि डॉ. दीपक चव्हाण आदी उपस्थित होते.

# शिवजयंती

महावीर महाविद्यालयामध्ये दिनांक ५मार्च २०२६रोजी शिवजयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावर्षी नाविन्यपूर्ण पद्धतीने शिवजयंती साजरी करावयाचे विभागाने ठरविले होते. आपल्याच विभागातील विद्यार्थिनी कुमारी तेजस्विनी आमणे हिची प्रमुख पाहुणे म्हणून निवड करण्यात आली होती. तिने 'शिवाजी महाराजांचे स्त्रियांविषयीचे विचार' याविषयी आपले मत मांडले. अयान मुल्ला आणि आदित्य धनवडे या विद्यार्थ्यांने शिवाजी महाराजांच्या वर आधारित कविता सादर केल्या. अध्यक्ष मनोगत इतिहास विभाग प्रमुख डॉक्टर महादेव शिंदे सर यांनी मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी सानिका सावंत हिने केले. कार्यक्रमाचे आभार कार्तिक निर्मल याने मानले.

या निमित्ताने विभागामार्फत घेण्यात आलेल्या मोडी लिपी प्रशिक्षण वर्गातल्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मोडी लिपीतील पोस्टरचे प्रदर्शन करण्यात आले होते. यावेळी एकूण १३ विद्यार्थ्यांनी पोस्टर बनवले होते. यावेळी इतिहास विभागातील प्राध्यापक चंद्रशेखर काटे, पियुष डहाळे, सुरज चौगुले, उत्तम वडिंगेकर, अमित पाटील आणि डॉ. दीपक चव्हाण आदी उपस्थित होते.

# नोटीस

दि. ६/०३/२०२६

इतिहास विभागातील सर्व प्राध्यापकांना कळविणेत येते की,गुरूवार दि. ११/३/२०२६ रोजी इतिहास विभागात स. ११.०० वाजता बैठक आयोजित करणेत आली आहे. तरी सर्व प्राध्यापकांनी वेळेत उपस्थित रहावे, ही विनंती

**बैठकीपुढील विषय :-**

१) अभ्यासक्रम पूर्तता

२) गुणदान करणे

डॉ. महादेव शिंदे

इतिहास विभागप्रमुख

# इतिवृत्त

इतिहास विभागाची नियोजित बैठक विभागात दिनांक ११/३/२०२६रोजी इतिहास विभागप्रमुख डॉ. महादेव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत द्वितीय सत्राच्या अभ्यासक्रमाची पूर्तता व विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक कार्याचे गुणदान पूर्तता यासंबंधी चर्चा पार पडली. व विभागप्रमुखांनी विभागाची पुढील ध्येय-धोरणे यासंबंधी देखील चर्चा केली. विशेषत: BOS मिटिंगबद्दल अधिक चर्चा झाली.